महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक अधिकारी-कर्मचारी असोसिएशनच्या वतीने व महाराष्ट्र राज्य वित्त व लेखा विभागातील अधिकारी कर्मचारी यांच्या पुढाकाराने मा. श्री. एजाज नकवी साहेब, संचालक, लेखा व कोषागारे यांच्या निवृत्ती प्रित्यर्थ कार्यगौरव व मा. डॉ. मकसूद अहमद खान साहेब, मुख्य कार्यकारी अधिकारी, यांची केंद्रीय हज समिती या पदी नियुक्ती प्रित्यर्थ सत्कार कार्यक्रम दिनांक १० नोव्हेंबर २०१७ रोजी हज हाऊस, मुंबई येथे पार पडला.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जे. जे. रुग्णालयाचे विभाग प्रमुख मा. डॉ. सादीक पटेल साहेब उपस्थित होते. सन्माननीय अतिथी म्हणून तत्कालिन सहसचिव व प्रबंधक, महाराष्ट्र जलनियमक प्राधिकरण मा. श्रीमती नसिमा शेख मॅडम ह्या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहसचिव, सामान्य प्रशासन विभाग मा. श्री. इम्तियाज काझी साहेब उपस्थित होते.

या प्रसंगी श्री. मो. युसूफ निशानदार व श्री. गफ्फार बेग (दोघेही कार्यकारी अभियंता, सिडको) यांचा निवृत्ती निमित्य सत्कार करण्यात आला. याशिवाय श्री. अजिज शेख, उपायुक्त, महापालिका, श्री. सलिम शेख, कार्यकारी अभियंता, सा.बा.वि., श्री. सोहेल खान, कार्यकारी अभियंता, सिडको, श्री. यासिन मापारा, कार्यकारी अभियंता, सिडको यांचा हज यात्रा केल्यामुळे विशेष सत्कार करण्यात आला.  याशिवाय श्री. नासिर खान, निरीक्षक, मुंबई महानगरपालिका यांचा राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार मिळाल्यामुळे सत्कार करण्यात आला.

श्री. शिराज शेख, अधिक्षक अभियंता, बी.पी.टी., श्री. शहनवाज मुलाणी, अवर सचिव, श्री. फारुक पठाण, कक्ष अधिकारी, मंत्रालय, मा. श्री. फिरोज पटेल, ॲड.  रहमतुल्ला मोमिन, श्री. सैफूल्ला खान, डॉ. अमजद पठाण, यांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमास होती.

याप्रसंगी गौरवमुर्ती मा. श्री. इजाज नकवी साहेब यांचा शाल, मानपत्र व रोपटे देऊन कार्यगौरव करण्यात आला व सत्कारमुर्ती मा. डॉ. मकसूद खान साहेब यांचा शाल व रोपटे देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी असोसिएशनतर्फे इतर सत्कारमुर्तींचा शाल, स्मृतीचिन्ह व रोपटे देऊन सत्कार करण्यात आला.

मा. डॉ. मकसूद खान तथा एम. ए. खान यांची केंद्रीय हज समितीवर सी.ई.ओ.पदी नियुक्ती झाल्यामुळे त्यांचे असोसिएशनच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये अल्पसंख्यांक समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना युपीएससी, एमपीएससी स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन मिळण्यासाठी केंद्रीय हज समितीतर्फे विशेष तरतूद करण्यात येईल, असे सांगितले.

याप्रसंगी गौरवमुर्ती या नात्याने मा. श्री. एजाज नकवी साहेब यांनी असोसिएशनच्या वतीने गौरव करण्यात आल्यामुळे आनंद झाल्याचे सांगून यापूढेही असोसिएशनसाठी आपण कार्यरत राहू असे आश्वासन दिले.

या कार्यक्रमाचे सन्माननीय अतिथी मा. श्रीमती नसिमा शेख मॅडम यांनी अल्पसंख्यांक समाजासाठी असोसिएशनच्या वतीने करण्यात येणाऱ्या उपक्रमांची प्रशंसा केली व नेहमीच आपले योगदान देण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी मा. डॉ. सादिक पटेल साहेब यांनी आपल्या भाषणात शासन-प्रशासनातील अल्पसंख्यांक अधिकारी-कर्मचारी यांनी एकत्र येऊन अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी व सक्षमीकरणासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. ज्यायोगे सक्षम भारत घडवून राष्ट्रीय एकात्मता अबाधित राहण्यास मदत होईल. असे मत मांडले.

अध्यक्षीय भाषणात मा. श्री. इम्तियाज काझी साहेब यांनी असोसिएशनचे कार्य वाढण्यासाठी मंत्रायलयातील कर्मचाऱ्यांचा सहभाग आवश्यक असल्याचे सांगून असोसिएशन करीत असलेल्या कार्याबद्दल प्रशंसा केली.

कार्यक्रमाची भूमिका विषद करताना असोसिएशनचे अध्यक्ष श्री. हाजी जतकर, विक्रिकर उपायुक्त यांनी सांगितले की, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा या आदर्श विचारसरणीवर महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक अधिकारी कर्मचारी असोसिएशनची स्थापना महाराष्ट्रात झाली. या असोसिएशनला शासनाचे पाठबळ लाभले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर अल्पसंख्यांक अधिकारी - कर्मचारी यांच्या हितासाठी शासनाच्या पाठबळाने काम करणारे देशातील हे एकमेव व्यासपीठ आहे. असोसिएशनचे ब्रीदवाक्य च्समतेसाठी एकत्र येऊ आणि सार्वभौम व धर्मनिरपेक्ष राष्ट्र घडवूछ असे असून या असोसिएशनच्या माध्यमातून आम्ही अनेक उद्देश अधोरेखित केले असताना देशहित समोर ठेवून या देशाची राष्ट्रीय एकात्मता कशी अबाधित राहील याकडे विशेष लक्ष देत आहोत. या व्यासपीठाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचे अनेक उपक्रम राबविले असून अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्श विचारसरणीवर संपूर्ण महाराष्ट्रात काम करीत असून आज महाराष्ट्रात ३० जिल्ह्यांमध्ये असोसिएशनचे काम सुरु आहे. असोसिएशनच्या माध्यमातून अल्पसंख्यांक समाजातील अधिकारी व कर्मचारी यांना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी प्राप्त झाली आहे, असे सांगितले.

महाराष्ट्र लेखा व कोषागारे विभागातील श्री. मनोजकुमार शेटे, सहाय्यक संचालक, श्री. फिरोज मुल्ला, सहा. संचालक, श्री. सरफराज मोमिन, लेखाधिकारी, श्री. शकील देशपांडे, सहा.लेखाधिकारी, श्री. सलिम मुलाणी, सहा. लेखाधिकारी, श्री. अनिस पटेल, सहा. लेखाधिकारी, श्री. पिंजारी, सहा. लेखाधिकारी, श्री. शेख, लिपिक या अधिकारी कर्मचारी यांच्या अथक परिश्रमाने हा कार्यक्रम आयोजित केल्यामुळे त्यांचा सत्कार मा. श्री. इजाज नकवी साहेब यांच्या हस्ते करण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. अजीज शेख (उपायुक्त, महानगरपालिका), श्री. ताजदारखान पठाण (विक्रीकर उपायुक्त), श्री. सलीम शेख (कार्यकारी अभियंता, सा. बां. वि.), श्री. मो. युसुफ निशानदार (कार्यकारी अभियंता, सिडको), श्री. अशफाक शेख (सहा. संचालक, नगररचना), श्री. यासीन मापारा (सहा. कार्यकारी अभियंता, सिडको), श्री. सुहेल खान (सहा. कार्यकारी अभियंता, सिडको), श्री. नजीर शेख (विक्रीकर उपायुक्त), श्री. तन्वीर सय्यद (सहा. विक्रीकर आयुक्त), श्री. गुलामनबी शेख (शिधावाटप अधिकारी), श्री. दस्तगीर मुल्ला (राजपत्रित स्टेनो), श्री. मोहमद हानिफ पिरजादे (विक्रीकर अधिकारी), श्री. इम्रान मुजावर (विक्रीकर अधिकारी), श्री. मोईज शेख (उपअधीक्षक, बीएमसी), श्री. समीर पेरामपल्ली (सहा. अभियंता सिडको), श्री. मोहसीन बागवान (सहा. कक्ष अधिकारी), श्री. एन. जी. शेख (सर्व्हेअर सिडको), श्री. नासीर खान (विभाग निरीक्षक, बीएमसी), श्री. जाहिद अली शेख (विक्रीकर निरीक्षक), श्री. वहिद झारी (विक्रीकर निरीक्षक), श्री. सलीम मुलाणी (सहा.लेखाधिकारी ), श्री. फारूक खाटीक (पदवीधर शिक्षक), श्री. अखलाख शेख (शिक्षक), श्री. हैदर शेख (वरिष्ठ लिपिक), श्री. हसन खान (लिपिक, बीएमसी), श्री. गौस इनामदार, श्री. शहेनशाह पटेल, श्री. मोहम्मद हनिफ जातकर, श्री. बशीर भाई शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. नासीर खान (विभाग निरीक्षक, बीएमसी) व श्री. फारूक खाटीक (पदवीधर शिक्षक) यांनी अतिशय सुंदरपणे केले. असोसिएशनचे उपाध्यक्ष व कार्यकारी अभियंता श्री. सलिम शेख यांनी आभार मानले.

शेवटी राष्ट्रगीत गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमात शासन प्रशासनातील मान्यवर, विचारवंत व वेगवेगळ्या विभागातील असोसिएशनचे अधिकारी-पदाधिकारी व सदस्य असे एकूण १२५ व्यक्ती उपस्थित होते.